फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

नागपूर जिल्हा

२००२-२००३

अर्थ व सांख्यिकी संचालनालय
महाराष्ट्र शासन
मुंबई.

फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

2002-2003

जिल्हा : नागपूर

जिल्हा सांख्यिकी कार्यालय,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन,
नागपूर

अनुक्रमणिका

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2002-2003

अ.क्र.	तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	2	3	4
		भाग - 1 दृष्टिक्षेपात जिल्हा	1 ते 7
		सामाजिक व आर्थिक समालोचन	1 ते 20
		भाग - 2 1. क्षेत्रफळ व लोकसंख्या	
1	1.1	2001 च्या जनगणनेनुसार तालुकावार क्षेत्रफळ,घरे व लोकसंख्या	1
2	1.2	1951 पासूनच्या लोकसंख्येमधील दशवार्षिक वाढ	3
3	1.3	1991च्या जनगणनेनुसार लोकसंख्या गटानुसार गावांचे तालुकावार वर्गीकरण	11
4	1.4	2001 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या गटानुसार शहरांचे तालुकावार वर्गीकरण	13
5	1.5(अ)	1991 च्या जनगणनेनुसार काम करणारे व काम न करणा-यांची संख्या	15
6	1.5(ब)	1991 च्या जनगणनेनुसार मुख्यत काम करणा-या व्यक्तिंची उद्योगगट क्षेत्रनिहाय विभागणी	19
7	1.6(अ)	लोकसंख्येचे वयोगटानुसार वर्गीकरण जनगणना 1991	20
8	1.6(ब)	लोकसंख्येचे धर्मानुसार वर्गीकरण जनगणना 1991	21
9	1.7	1991 च्या जनगणनेनुसार अनुसुचित जाती व जमातीकरिता आकडेवरी	22
10	1.8	भिंती ,छपरे यासाठी वापरलेल्या साधन सामुग्रीनुसार घरांचे वर्गीकरण	24
11	1.9	आकार व मालकीच्या स्थितीनुसार ग्रामीण/नागरी क्षेत्रातील कुटुंबाचे वर्गीकरण	25
12	1.10	जनगणना घरे आणि त्यांचा वापर	26
13	1.11	क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न व दरडोई उत्पन्न - चालु किंमतीनुसार	27
14	1.12	क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न व दरडोई उत्पन्न - स्थिर (1993-94) किंमतीनुसार	28
		2.हवामान	
15	2.1	निवडक केंद्रातील पर्जन्य दिवसांची संख्या व एकूण पर्जन्य	29

अ.क्र.	तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	2	3	4
		3.कृषी	
16	3.1	जमीनचा वापर	34
17	3.2	तहसिलवार निरनिराळ्या पिकाखालील क्षेत्र	36
18	3.3	मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पादन व एकूण उत्पादन	44
19	3.4	विविध साधनांनी ओलीताखाली आलेले तालुकावार क्षेत्र	45
20	3.5	निरनिराळ्या पिकाखालील ओलीताचे तालुकावार क्षेत्र	46
21	3.6(अ)	तालुकावार सिंचन विहीरी आणि इतर विहीरी	51
22	3.6(ब)	तालुकावार कुपनलीका,हातपंप चालु असलेल्या हातपंप व विद्युत पंपाची संख्या	52
23	3.7	विहीरी खेरीज लघु पाटबंधारे यांची कामे	53
24	3.8	मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पामुळे भिजणारे क्षेत्र व मिळणारे फायदे	55
25	3.9	वहित धारण जमीनीची संख्या व त्यांचे क्षेत्रफळ, ओलीता खाली असलेली वहितधारण जमीन आणि ओलीताखालील निव्वळ क्षेत्र व वहितीच्या व प्रकारानुसार क्षेत्रफळ श्रेणीनुसार वहित धारण जमीनीची संख्या (1990-91)	59
26	3.10	कृषी विषयक अवजारे कृषी गणना 1997	63
27	3.11	दुष्काळ,टंचाई व टंचाई सदृश परिस्थितीची माहिती	64
		4.पशुसंवर्धन	
28	4.1	तहसिलवार पशुधन (1997 च्या पशुगणनेप्रमाणे)	67
29	4.2	जिल्हयातील पशुवैद्यकीय संस्थाची तालुकावार संख्या	74
30	4.3	रोगांच्या प्रकारानुसार पशुच्या मत्युची संख्या	76
31	4.3(अ)	विविध पशुवैद्यकीय संस्थाचे कार्य	77
32	4.4	मान्यताप्राप्त पशुवधगृहे आणि प्रत्येक पशुवधगृहात कत्तल केलेल्या पशुंची संख्या	78
33	4.5	जिल्हयातील वनक्षेत्र	79
34	4.6	जिल्हयातील मुल्य व गौण वनउत्पादने	80
35	4.7	जिल्हयातील भूजल मत्स्यव्यवसाय	81
36	4.8	जिल्हयातील सागरी मत्स्यव्यवसाय	

	तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
	2	3	4
		5.रोजगार उद्योग,खनिकर्म व वीज	
37	5.1	कारखान्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या	82
38	5.2	चालु कारखान्यांचे व कामगारांच्या संख्येनुसार उद्योगनिहाय वर्गिकरण	88
39	5.3	कामाच्या दिवसांच्या संख्येनुसार चालु असलेल्या कारखान्यांचे वर्गिकरण	92
40	5.4	उद्योगाच्या महत्वाच्या बाबींचा तपशिल (वार्षिक उद्योग पाहणी)	96
41	5.5	रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील आकडेवारी	100
42	5.6	व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम	102
43	5.7	जिल्हयातील कर्मचा-यांची संख्या (कर्मचारी गणना 2002)	103
44	5.8	निरनिराळया उद्योगातील रोजगार	104
45	5.9	विद्युतीकरण झालेल्या शहरांची व गावांची संख्या व त्यांची लोकसंख्या	105
46	5.10	विजेचा वापर	106
47	5.11	कृषी व बिगर कृषी उद्योग (आर्थिक गणना 1998)	107
48	5.12	प्रमुख उद्योग गटानुसार (कृषी व बिगर कृषी उद्योग)उद्योगांची संख्या आणि सर्वसाधारपणे नेहमी काम करणा-या कामगारांची संख्या (आर्थिक गणना 1998)	108
49	5.13	महत्वाच्या उद्योग गटानुसार कृषी व बिगर कृषी आस्थापनांची संख्या (आर्थिक गणना 1998)	109
50	5.14	महत्वाच्या उद्योग गटानुसार कृषी व बिगर कृषी आस्थापनांतील कामगारांची संख्या (आर्थिक गणना 1998)	110
51	5.15	बिगर कृषी सहकारी आस्थापना (सर्व गट एकत्र) (आर्थिक गणना 1998)	111
52	5.16	उद्योग गटानुसार सहकारी औद्योगिक संस्था व रोजगार यांची संख्या - (आर्थिक गणना 1998)	112
53	5.17(अ)	वस्तूनिर्माण व दुरुस्ती सेवा या गटातील स्वकार्यरत उद्योगांची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कर्मचा-यांची आकारमान	113
54	5.17(ब)	गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	114
55	5.18(अ)	घाऊक व किरकोळ व्यापारामधील स्वकार्यरत उद्योगांची संख्या व नेहमी काम करणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	115
56	5.18(ब)	घाऊक व किरकोळ व्यापार उद्योग गटातील आस्थापनांची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कर्मचा-यांची आकारमान संख्या (आर्थिक गणना 1998)	116
57	5.19(अ)	सामुहिक,सामाजिक व व्यक्तिगत सेवा मधील एकूण स्वकार्यरत उद्योगाची संख्या व नेहमी काम करणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	117

अ.क्र.	तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	2	3	4
58	5.19(ब)	सामुहिक,सामाजिक व व्यक्तिगत सेवामधील आस्थापनेची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	118
59	5.20(अ)	सर्व उद्योग गट मिळून एकूण स्वकार्यरत उद्योगांची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कर्मचा-यांची आकरमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	119
60	5.20(ब)	सर्व उद्योग गट मिळून एकूण उद्योग गटामधील आस्थापनांची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	120
		6.सहकार	
61	6.1	विविध प्रकारच्या सहकारी संस्था	121
62	6.2	जिल्हयातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची माहिती	122
63	6.3	जिल्हयातील सहकारी संस्थाची लेखा परीक्षण वर्गाप्रमाणे वर्गवारी	123
64	6.4	जिल्हयातील राज्य आणि जिल्हा पातळीवरील सहकारी बँकेची कार्य	124
65	6.5	जिल्हयातील प्राथमिक कृषी सहकारी संस्थाचे कार्य	125
66	6.6	जिल्हयातील शेतकरी सेवा संस्थाचे कार्य	--
67	6.7	जिल्हयातील आदिवासी सहकारी संस्थाचे कार्य	128
68	6.8	जिल्हयातील प्राथमिक-कृषी सहकारी संस्थांनी दिलेली पीक कर्जे	131
69	6.9	जिल्हयातील शेतकरी सेवा संस्थानी दिलेली पीक कर्जे	--
70	6.10	जिल्हयातील आदिवासी सहकारी संस्थान्नी दिलेली पीक कर्जे	132
71	6.11	जिल्हयातील विगर कृषी सहकारी पतसंस्थांचे कार्य	133
72	6.12	जिल्हा आणि प्राथमिक पणन संस्थाचे कार्य	134
73	6.13	जिल्हयातील उत्पादन संस्था आणि सामाजिक सेवा संस्थाचे कार्य	137
74	6.14	जिल्हयातील उत्पादन संस्था आणि सामाजिक सेवा संस्था यांचे प्रमुख कार्याचा तपशिल	138
75	6.15	जिल्हयातील नियंत्रित बाजारपेठांची माहिती	139
76	6.16	जिल्हयातील सावकारांची संख्या आणि त्यांनी दिलेली कर्जे	147
		7.वैद्यकीय व आरोग्य सेवा	
77	7.1	सार्वजनिक व अर्ध सहाय्यीत संस्थामार्फत उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सुविधांची माहिती	148
78	7.2	नोंदणी केलेल्या जन्म-मृत्यूंची संख्या	150
79	7.3	विविध कारणानुसार मृत्यूंची संख्या	152
80	7.4	माता बाल संगोपन कार्यक्रम अंतर्गत लस टोचणी	153
81	7.5	जिल्हयातील कुटुंब नियोजन केंद्राची संख्या	154

अ.क्र.	तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	2	3	4
		8. शिक्षण	
82	8.1	2001 च्या जनगणनेनुसार तालुकावार साक्षरता	155
83	8.2	शैक्षणिक संस्था आणि शिक्षकांची आणि विद्यार्थ्यांची संख्या	156
84	8.3	पूर्व प्राथमिक,प्राथमिक,माध्यमिक व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची स्तरनिहाय संख्या आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांची वर्गवारी	157
85	8.4	इतर प्रकारच्या शैक्षणिक संस्था	158
86	8.5	आर्थिक दृष्टया मागसलेल्या विद्यार्थ्याना मिळणा-या शैक्षणिक सवलती	159
87	8.6	प्राथमिक शिक्षणावरील खर्च	160
88	8.7	जिल्हयातील व्यवसाय मार्गदर्शन (कनिष्ठ महाविद्यालय) तांत्रिक शाळा (आठवी ते बारावी)	161
89	8.8	जिल्हयातील प्रौढ शिक्षण कार्यक्रम	--
90	8.9	शिक्षकाकरिता प्रशिक्षण संस्था	162
91	8.10	तालुकावार शारीरीक शिक्षण महाविद्यालये, क्रिडांगाणे , क्रिडा संस्था आणि क्रिडा शिष्यवृत्तीधारक इत्यादी माहिती	163
		9. वाहतूक व दळणवळण	
92	9.1(अ)	रेल्वे मार्गाची लांबी	164
93	9.1(ब)	रेल्वे स्थानकांची तालुकावार यादी	165
94	9.2	प्रकार व पृष्टभाग.यानुसार रस्त्यांची लांबी	166
95	9.3	वापरात असलेली मोटर वाहनांची संख्या	167
96	9.4	महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (प्रवासी) वाहतूक	168
97	9.5	महत्वाच्या रस्त्यांवरील वाहतुके गणना	169
98	9.6	पोस्ट,तारघरे व दुरध्वनी सेवा यांची आकडेवारी	181
		10. स्थानिक संस्था	
99	10.1	स्थानिक संस्थाचे उत्पन्न व खर्च	182
100	10.2	ग्रामपंचायतीचे उत्पन्न व खर्च	183
101	10.3	जिल्हापरिषदेचे बाबवार उत्पन्न व खर्च	186
102	10.4	महानगरपालिका कटकमंडळे व महानगरपालिकांची उत्पन्न व खर्च	188

	तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
	2	3	4
		11. नियोजन	
103	11.1	विविध विकास शिर्षाखाली झालेला योजनाअंतर्गत खर्च	190
104	11.2	योजनेखालील महत्वाची भौतीक साध्ये	192
105	11.3	रोजगार हमी योजना	201
106	11.4	रोजगार हमी योजनेखाली घेतलेली कामे,त्यावरील रोजगार व खर्च	202
107	11.5	पिण्याच्या पाण्याच्या सोई व टंचाई संबंधी केलेल्या उपाययोजना	203
108	11.6	संकरीत व अधिक उत्पादन देणा-या पिकांच्या जाती व त्याखालील क्षेत्र	205
109	11.7	जिल्हयातील रासायनिक खताचे वाटप	212
110	11.8	जिल्हयातील साखर कारखाने गळीत हंगामाकरिता	213
111	11.9	दुग्ध संस्थांची संख्या	214
112	11.10	अवर्षण प्रवण कार्यक्रमांची पगती दर्शविणारा तक्ता	215
113	11.11	जिल्हयातील एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमाची प्रगती व त्यावरील तरतूद व खर्च	216
114	11.12	वीस कलमी कार्यक्रम	218
115	11.13	विशेष घटक योजना	219
116	11.14	जिल्हयाचा स्थानिक विकास कार्यक्रम	220
		12. किंमती व निर्देशांक	
117	12.1	जिल्हयातील निव्वळ शेतीमालाच्या सरासरी घाऊक किंमती	222
118	12.2	जिल्हयातील मुख्यालयाच्या ठिकाणाच्या महत्वाच्या वस्तुंच्या मासिक सरासरी किरकोळ किंमती	224
119	12.3	महत्वाच्या ग्राहक किंमतीचे निर्देशांक	230

	तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
	2	3	4
		13.न्याय व प्रशासन	
120	13.1	जिल्हयातील पोलीस अधिकारी/कर्मचा-यांची एकूण संख्या	231
121	13.2	जिल्हयातील गुन्हयासंबंधीची आकडेवारी	232
122	13.3	तुरुंगात दाखल केलेले गुन्हेगार	233
123	13.4	तुरुंगात दाखल केलेले गुन्हेगाराचे वयोगटानुसार व शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण	234
124	13.5	दिवाणी व फौजदारी न्यालयात निकालात काढलेली कामे/प्रकरणे	235
		14. बॅकींग व विमा	
125	14.1	जिल्हयातील बँक कार्यालये,वर्गीकृत वँकाची संख्या,ठेवी व कर्जे	236
126	14.2	जिल्हयातील चालू असलेल्या संयुक्त भांडवलाची संख्या	237
127	14.3	उतरविलेल्या विमा पत्रांची संख्या व विम्याची रक्कम	237
		15. संकिर्ण	
128	15.1	जिल्हयातील चित्रपट गृहाविषयी आकडेवारी	238
129	15.2	गोळा केलेली अल्पबचत गुंतवणूक व खातेदारांची संख्या	239
130	15.3	तहसिल निहाय गोळा केलेला जमीन महसुल	240
131	15.4	मुद्रणालये आणि त्यात छापलेली व प्रकाशित केलेली वर्तमानपत्रे आणि नियतकालिके	241
132	15.5	स्वस्त धान्य दुकानांना पुरविलेले तांदुळ,गहू व साखर	243
133	15.6	जिल्हयातील लोकसभा व विधानसभा निवडणूक संबंधी आकडेवारी	244
134	15.7	जिल्हयातील अधिकारी व प्रवासी यांचेसाठी असलेल्या विश्रामगृहाची तालुका निहाय यादी	248
135	15.8	निवडक निर्देशांकाचे कल	250

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2002-2003

दृष्टिक्षेपात जिल्हा - नागपूर

अ.क्र. 1	बाब 2	परिमाण 3	जिल्हा नागपूर 4	महाराष्ट्र राज्य 5
(एक)	**प्रशासकिय रचना**			
	अ) भौगोलिक स्थान		0	0
	1) उत्तर अक्षांश	अंश	20.35 ते 21.44	16.4 ते 22.1
			0	0
	2) पूर्व रेखांश	अंश	78.15 ते 79.40	72.6 ते 80.9
	ब) हवामान			
	तापमान		1998	2001-2002
	1) किमान	डिग्री सेल्सीअस	6.6	5.6
	2) कमाल	डिग्री सेल्सीअस	46.8	45.9
	3) पर्जन्य (सरासरी)	मि.मि.	870.2(2002)	1628.00(1998)
	क) प्रशासकिय विभाग(2002-2003)			
	1) तहसिल	संख्या	14	353
	2) पंचायत समित्या	संख्या	13	347
	3) टंचाई ग्रस्त तालुके	संख्या	1	उ.ना.
	4) एकात्मिक ग्रामीण विकास प्रकल्प	संख्या	1	उ.ना.
	5) शहरे	संख्या	29	378
	6) गावे (एकूण) 2001प्रमाणे	संख्या	1874	43722
	1) निर्जन	संख्या	312	उ.ना.
	2) वस्ती असलेली	संख्या	1562	43722 ।
	7) क्षेत्रफळ	चौ.कि.मी.	9892	307583
(दोन)	**प्रशासकिय संस्था (2002-2003)**			
	1) पंचायत समित्या	संख्या	13	347
	2) महानगरपालिका	संख्या	1	19
	3) नगरपरिषदा	संख्या	10	224
	4) कटक मडळे	संख्या	1	7
	5) ग्रामपंचायती	संख्या	778	27805(0)

। वस्ती नसलेली गावे धरुन

(0) नगर पंचायतीसह

आकडे	बाब	परिमाण	जिल्हा नागपूर	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
		संख्या	59	926
				(31डिसे.2001)
	तलाठी आजूबाजूचे पोस्ट	संख्या	121	1769
				(31डिसे.2001)
(तीन)	लोकसंख्या 2001 प्रमाणे			
	1) ग्रामीण लोकसंख्या	आकडे हजारात	1444	55732
	2) नागरी लोकसंख्या	आकडे हजारात	2607	41020
	3) एकूण लोकसंख्या	आकडे हजारात	4051	96752
	4) अनुसुचित जातीची लोकसंख्या(1991)	आकडे हजारात	619	8758
	5) अनुसुचित जातीच्या लोकसंख्या 1991 ची एकूण लोकसंख्येची टक्केवारी	टक्केवारी	18.84	11.09
	6) अनुसुचित जमातीची लोकसंख्या(1991)	आकडे हजारात	458	7318
	7) अनुसुचित जमातीच्या लोक संख्यची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी(1991)	टक्केवारी	13.92	9.27
	8) पुरुष (2001)	आकडे हजारात	2095	50334
	9) स्त्रिया	आकडे हजारात	1956	46418
	10) स्त्री - पुरुष प्रमाण	1000 पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण	934	922
	11) घनता (1991)	दर चौरस कि.मी. क्षेत्रातील लोकसंख्या	331	314
	12) साक्षरतेचे प्रमाण (2001)			
	1) एकूण	टक्केवारी	84.18	77.3
	2) पुरुष	टक्केवारी	90.25	86.3
	3) स्त्रिया	टक्केवारी	77.65	67.5
	4) राज्यामध्ये जिल्ह्यांचा क्रमाक	संख्या		
(चार)	कृषि (अस्थायी)		(2000-2001)	(2001-2002)
	1) भौगोलिक क्षेत्र	हजार हेक्टर	986	30758
	2) जंगलव्याप्त क्षेत्र	हजार हेक्टर	135	5214
	त्याची भौगोलिक क्षेत्राची टक्केवारी	टक्केवारी	13.69	16.95
	3) शेतीस उपलब्ध नसलेली जमीन			
	अ) बिगर शेती वापराखालील जमीन	हजार हेक्टर	61	1380
	ब) पडीत आणि लागवडीलायक नसलेली जमीन	हजार हेक्टर	45	1720
	क) एकूण (अ ब)	हजार हेक्टर	106	3100

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा नागपूर	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
	४) पडीत जमिनी व्यतिरिक्त लागवड			
	न केलेली इतर जमीन			
	1) कायम गुरे चरण आणि इतर	हजार हेक्टर	53	1249
	2) झाडे झुडपाखालील जमीन	हजार हेक्टर	19	247
	3) लागवडीयोग्य परंतु पड जमीन	हजार हेक्टर	51	915
	5) पडीत जमीन			
	1) चालू पड	हजार हेक्टर	36	1255
	2) इतर पड	हजार हेक्टर	34	1200
	6) पिकाखालील जमीन			
	1) पिकाखालील निव्वळ क्षेत्र	हजार हेक्टर	518	17579
	2) दुर्सोटा क्षेत्र	हजार हेक्टर	91	4808
	3) एकूण पिकाखालील क्षेत्र	हजार हेक्टर	609	22387
	7) ओलित क्षेत्र			
	1) निव्वळ ओलित क्षेत्र	हजार हेक्टर	93	2971
	2) एकूण ओलित क्षेत्र	हजार हेक्टर	213	3668
	8) महत्वाच्या पिकाखालील क्षेत्र (अन्नधान्य)	हजार हेक्टर	287	12779
	9) वहित धारण जमीन (अंतिम) (1990-91)			
	1) 2 हेक्टरपेक्षा कमी	हजार हेक्टर	114	7442
	2) 2 ते 10 हेक्टर	हजार हेक्टर	97	3095
	3) 10 हेक्टरपेक्षा जास्त	हजार हेक्टर	4	116
	10) जमीन महसूल वसुली (2002-2003) (सुधारित)	लाख रुपये	193	2368 (एकत्रित)
	11) जिल्हा परिषदाचा उपकर	हजार रुपये	5763	
	12) पंचायत समित्यांचा उपकर		622	
(पाच)	पशुसंवर्धन (पशुगणना) (1997)			
	1) एकूण पशुधान	संख्या हजारात	1098	39638
	2) गायी व बैल	संख्या हजारात	639	18071
	3) म्हशी व रेडे	संख्या हजारात	98	6073
	4) मेंढ्या व शेळ्या	संख्या हजारात	345	14802
	5) कोंबड्या व बदके	संख्या हजारात	691	35392

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा नागपूर	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
(सहा)	सहकार (2002-2003)			
	1) सहकारी संस्था	संख्या	4068	173402
	2) प्राथमिक कृषि सहकारी पत संस्था	संख्या	580	20839
	3) प्राथमिक कृषि सहकारी पत संस्थांची सभासद संख्या	संख्या हजारात	208	11436
	4) सहकारी दुग्ध संस्था	संख्या	217	25574
	5) प्राथमिक कृषि पत संस्थांनी दिलेली कर्जे	रुपये कोटीत	67.72	4076
(सात)	जलसिंचन		(6/2003अखेर)	(6/2003अखेर)
	अखेरपर्यंत पुर्ण झालेले पाटबंधारे प्रकल्प व त्याखालील लाभक्षेत्र			
	1) मोठे प्रकल्प	संख्या	1	32
	2) मध्यम प्रकल्प	संख्या	15	178
	1 व 2 चे लाभक्षेत्र	हजार हेक्टर	252	उ.ना.
	3) लघु प्रकल्प (राज्यक्षेत्र)	संख्या	49	2182
	लाभक्षेत्र	हजार हेक्टर	18	उ.ना.
	4) सिंचन विहीरीखाली भिजणार क्षेत्र	हजार हेक्टर	44	1931
(आठ)	उद्योग		2002	2002
	1) नोंदणीकृत कारखान्यांची संख्या	संख्या	1733	34170
	2) नोंदणीकृत चालु कारखान्यांची संख्या (उत्पादन चालु कारखाने)	संख्या	1496	28707
	3) सहकारी साखर कारखान्यांची संख्या (2002-2003)	संख्या	2	201 (2002-2003)
	4) सहकारी साखर कारखान्यातील उत्पादन (2002-2003)	हजार मे.टन	2	6218
	5) सर्व सुत गिरण्यांची संख्या (2002-2003)	संख्या	7	230
(नऊ)	वीज		(31.3.2003)	(31.3.1998)
	1) वीजपुरवठा केलेली शहरे व खेडी	संख्या	1903	39413
	2) विद्युतीकरण झालेल्या गावांची संख्या	संख्या	1874	उ.ना.

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा नागपूर	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
	६) बोज पुरवठा केलेले पंप संच (मार्च,2003 अखेरपर्यंत)	संख्या '000'	62	2417
	७) बसविण्यात आलेले गोबरगॅस संयंत्रे	संख्या	14475	उ.ना.
(दहा)	**सार्वजनिक आरोग्य (2002-2003)**			
	१) रुग्णालये	संख्या	24	964
	२) दवाखाने (प्रा.आ.केंद्र म्हणून श्रेणी मुळे संख्येत घट	संख्या	124	2081
	३) प्राथमिक आरोग्य केंद्रे	संख्या	48	1806
	४) प्राथमिक आरोग्य पथके (अस्थायी)	संख्या	-	174
(अकरा)	**शिक्षण**		(2001-2002)	(2002-2003)
	1) एकूण प्राथमिक शाळा	संख्या	2475	67062
	2) प्राथमिक शाळेतील विद्यार्थी	संख्या हजारात	451	11837
	3) प्राथमिक शाळेतील शिक्षक	संख्या हजारात	13	315
	4) प्रत्येक शिक्षकामागे प्राथमिक शाळेतील विद्यार्थी	संख्या	35	38
(बारा)	**माध्यमिक शिक्षण 2001-2002**		(2001-2002)	(2002-2003)
	1) दुय्यम शाळा	संख्या	741	16917
	2) शाळेतील एकूण विद्यार्थी	संख्या हजारात	442	9864
	3) शाळेतील शिक्षण	संख्या हजारात	13	267
	4) प्रत्येक शिक्षकामागे प्राथमिक शाळेतील विद्यार्थी	संख्या	34	37
(तेरा)	**उच्च शिक्षण**			(2002-2003)
	1) संस्था	संख्या	153	1786
	2) एकूण विद्यार्थी	संख्या हजारात	85	1035
(चौदा)	अ) प्रौढ शिक्षण (2002-2003)			
	1) प्रौढ शिक्षण केंद्रे	संख्या	उ.ना.	उ.ना.
	2) प्रौढांची उपस्थिती (साक्षर)	संख्या हजारात	उ.ना.	5410

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा नागपूर	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
	ब) तांत्रिक व व्यवसाय शिक्षण		(2002-2003)	(2002-2003)
	1) औद्योगिक प्रशिक्षण संस्था	संख्या	40	612
	1) शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था	संख्या	15	347
	2) अशासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था	संख्या	25	265
	2) शासकिय व अशासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची प्रवेश क्षमता	संख्या	5672	93169
	3) पदवी अभ्यासक्रमाच्या तांत्रिक संस्था व त्याची पहिल्या वर्षीसाठी प्रवेश क्षमता	संख्या	13 4230	146 45232
	4) पदवीका व अभ्यासक्रमाच्या तांत्रिक संस्था व त्याची पहिल्या वर्षासाठी प्रवेश क्षमता	संख्या संख्या	9 3000	170 40185
	5) व्यवसाय शिक्षण संस्था (माध्यमिकव उच्च माध्यमिक गट) व त्याची प्रवेश क्षमता	संख्या संख्या हजारात	94 10	उ.ना. उ.ना.
(पंधरा)	परीवहन आणि दळणवळण (मार्च,2003 अखेर)			
	1) एकूण रेल्वे मार्ग लांबी	कि.मी.	421	5450
	2) रस्त्यांनी जोडलेली गांवे			
	अ) बारमाही	संख्या	739	37585
	ब) हंगामी	संख्या	493	1927
	3) एकूण रस्त्यांची लाबी (पृष्टांकित) 31 मार्च 2001	कि.मी.	9468	224940
	4) राष्ट्रीय महामार्गाची लांबी	कि.मी.	346	3710
	5) राज्य महामार्गाची लांबी	कि.मी.	954	33705
	6) महत्वाच्या जिल्हा रस्त्यांची लांबी	कि.मी.	1011	48192
	7) इतर जिल्हा रस्त्यांची लांबी	कि.मी.	1446	44183
	8) ग्रामीण रस्त्यांची लांबी	कि.मी.	3462	95150

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा नागपूर	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
(सोळा)	एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम			
	1) दारिद्र रेषेखालील कुटुंबे 1997-98 च्या सर्वेक्षणानुसार स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना	संख्या लाखात	1.09	38.19
	1) स्वरोजगारांची संख्या (2002-2003)	संख्या	1759	55772
(सतरा)	रोजगार निर्मिती (2002-2003)			
	अ) रोजगार हमी योजना	मनुष्य दिवस लाखात	10.35	1545.05
	ब) जवाहर ग्रामसमृध्दी योजना (2002-2003 अखेर)	मनुष्य दिवस लाखात	5.91	530.68
(अठरा)	आदिवासी कल्याणकारी योजना		(2002-2003)	-2003
	आदिवासीकरिता आश्रमशाळा	संख्या	8	929
	विद्यार्थी	संख्या	2520	312907
(एकोणव	मागासवर्गीयासाठी कल्याणकारी योजना		(2002-2003)	(2002-2003)
	अ) मागासवर्गीयासाठी वसतीगृहे	संख्या	9	243
	ब) वसतीगृहात राहणारे विद्यार्थी	संख्या	825	19028
(वीस)	जिल्हा नियोजन (2002-2003)			
	1) वार्षिक योजनेतील मंजूर तरतूद	रुपये कोटीत	27	308638
	2) अनुशेष भरुन काढण्यासाठी तरतूद	रुपये कोटीत	0.56	422.97
(एकेवीस	नागरी पुरवठा (2002-2003)			
	1) रास्त भावाची दुकाने	संख्या	1792	49921
	2) पुरविलेला एकूण साठा(डिसें.2003अखेर)			
	अ) गहू	हजार टन	23	863
	ब) तांदुळ	हजार टन	14	501
	3) शासकिय गोदामे (30.6.2003)	संख्या	13	994
	4) साठविण्याची क्षमता (30.6.2003)	मे.टन लाख टनात	1.54	584

टिप - 1) उ.ना. उपलब्ध नाही.

आधार 1) अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई.

2) जिल्हा सांख्यिकी कार्यालय,नागपूर.

भाग - १

समालोचन

2002-2003

सामाजिक व आर्थिक समालोचन 2002-2003

जिल्हा - नागपूर

1. स्थान व भौगोलिक वैशिष्टे

1.1 भौगोलिक स्थान :-

गोंड राजा बख्त बुलंद यांनी अठराव्या शतकात नागपूर बसविले. व शहराच्या नावावरुनच नागपूर जिल्ह्याचे नांव या जिल्हयास देण्यांत आले. पुढे भोसले घराण्याने नागपूरला आपली राजधानी केली व या शहराचा आणि जिल्हयाचा विकास केला. सन 1817 मध्ये सिताबर्डीच्या यध्दात ब्रिटीशांनी भोसले घराण्यावर विजय मिळविला. सन 1853 मध्ये भोसले घराण्याचा -हास होऊन ब्रिटीश राजवटीस सुरुवात झाली. मध्य प्रांत व वऱ्हाड याची राजधानी ब्रिटीशांनी नागपूर येथेच ठेवली. सन 1867 मध्ये ग्रेट इंडियन येनीनसुला रेल्वे (सध्याची मध्य रेल्वे) मुळे या शहराचा इतर प्रमुख शहरांशी संबंध जोडण्यांत आला. त्यामुळे नागपूर शहराच्या आणि जिल्हयाच्या विकासास गती मिळाली . सन 1947 ला स्वातंत्र्य प्राप्ती नंतर मध्य प्रदेशांची निर्मिती झाली तेव्हा पासून 1956 पर्येत नागपूर हे राजधानीचे ठिकाण होते. भाषावर प्रांत रचनेनंतर नागपूर जिल्हा द्विभाषिक मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला. त्यामुळे नागपूरच्या राजधानीचे स्वरुप संपुष्टात आले. दिनांक 1 मे, 1960 रोजी महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती नंतर नागपूर करारानुसार नागपूरला उपराजधानीचे स्थान देण्यात आले. नागपूर हा जिल्हा उत्तर अक्षांश 20. 35 ते 21 .44 व पूर्व रेखांश 78. 15 ते 79. 40 चे दरम्यान पसरलेला आहे. जिल्हयाचे मुख्यालय नागपूर येथे असून ते भारताचे मध्यवर्ती ठिकाण आहे. जिल्हयाच्या उत्तरेस मध्यप्रदेशातील छिंदवाडा व शिवनी जिल्हा व पूर्वेस भंडारा, दक्षिणेस चंद्रपूर आणि पश्चिमेस वर्धा जिल्हा आहे.

1.2 क्षेत्रफळ व प्रशासकीय विभाग :-

नागपूर जिल्हयाचे क्षेत्रफळ 9892 चौ.कि.मी.असून महाराष्ट्राच्या 3.23 टक्के आहे. तालुक्याच्या पुनर्रचनेपूर्वी पूर्ण जिल्हा पांच विभागात विभागलेला होता. त्या पांच विभागांचे मुख्यालय अनुक्रमे नागपूर,काटोल,सावनेर,रामटेक व उमरेड येथे होते. उपविभागीय अधिका-यांकडे त्या त्या उपविभागाची प्रशासकीय जबाबदारी होती. 1 मे,1981 नंतर तालुक्यांची पुनर्रचना करण्यात येऊन एकूण 14 तालुके निर्माण करण्यांत आले. नागपूर - शहर हा तालुका सोडल्यास सर्व तालुक्याचे मुख्यालय पंचायत समितीचे जे मुख्यालय होते तेच ठेवण्यांत आले.

2001 चे जनगणनेप्रमाणे नागपूर जिल्हयात 17 गणना शहरे आहेत. 2001 च्या जनगणनेनुसार एकूण 1874 खेडी असून त्यापैकी 1562 लोकवस्ती असलेली व 312 ओसाड खेडी आहेत. जिल्हयामध्ये 778 ग्रामपंचायतीं असून 10 कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. जिल्हयामध्ये 10 नगरपालिका 1 कटकमंडळ व 1 महानगरपालिका कार्यरत आहे.

1.3 भौगोलिक वैशिष्टे :-

भौगोलिक दृष्टया नागपूर जिल्हा साधारणतः तीन विभागामध्ये विभागल्या जातो. उत्तरेकडील टेकड्यांचा प्रदेश,पश्चिमेकडील डोंगराळ भाग व कन्हान,वेणा नदीच्या खो-यातील सखल भाग, उत्तरेकडील टेकड्यांचा प्रदेशात पिल्कापार,महादगड,गरमसूर,पिंपरडोह,जामगड,चापेगडी हया प्रमुख टेकडया असून ईशान्येस अंबागड आहे. रामटेकच्या टेकडीवर प्रसिध्द कालीदास स्मारक उभारण्यात आले आहे. जिल्हयाची समुद्रसपाटीपासून कमत कमी उंची 274 मी. व जास्तीत जास्त उंची 652 मी.आहे.

1.4 भूगर्भ रचना :-

नागपूर जिल्हयाच्या भूगर्भाची रचना विविध प्रकारच्या खनिजयुक्त खडकापासून तयार झाली आहे. जिल्हयातील कन्हान खो-यात कोळसा,खापा व सावनेर व रामटेक विभागात मॅगनीज,भिवापूर व उमरेड तालुक्यामध्ये कच्चे लोखंड, चुनखडी दगड, रामटेक व सावनेर तालुक्यातील कांद्री,पटगोवारी व देवलापार विभागात डोलामाईट दगड फार मोठया प्रमाणात आढळून येतो. याशिवाय फेल्सपार,क्वॉर्टर्स व टंगस्टन ही खनिजे आणि इमारती करिता उपयुक्त असणारे दगड या जिल्हयात सर्वत्र आढळून येतात. एकंदरीत या जिल्हयाची भूगर्भ रचना उपयुक्त खनिजांमुळे अतिशय समृध्द झालेली आहे.

1.5 नद्या :-

जिल्हयाच्या पश्चिम सीमेवरुन वर्धा व पूर्व सीमेकडून वैनगंगा नदी वाहते वैनगंगा नदीमुळे भंडारा जिल्हयाची आणि वर्धा नदीमुळे अमरावती जिल्हयाची सीमा निश्चित झालेली आहे. जाम व वेणा हया नद्या वर्धा नदीच्या उपनद्या असून जाम नदी काटोल तालुक्यातून वाहत जाऊन वर्धा नदीस मिळते. वेणा नदी कवडस पठारातून उगम पावून नागपूर तालुक्यातून वाहते. कन्हान नदी सातपुडा पर्वतातून उगमपावून वैनगंगेस मिळते. पेंच कोलार आणि नाग नदी हया कन्हान नदीच्या उपनद्या आहेत. कन्हान व पेंच नदीपासून नागपूर शहरास पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. कन्हानच्या खो-यातील जमीन अतिशय सुपीक समजली जाते.

1.6 हवामान व पर्जन्य :-

जिल्हयातील हवामान विषम स्वरुपाचे असून उन्हाळयात उष्ण तर हिवाळयात थंड असते. 1997 वर्षातील जून महिन्यात नागपूर विमानतळ येथील उष्णतेचे जास्तीत जास्त प्रमाण 45.2 डिग्री सेल्सीअस तर 1998 मध्ये हे प्रमाण 46.8 डिग्री सेल्सीअस पर्यंत नोंदल्या गेले. डिसेंबर 98 महिन्यात याच केंद्राचे उष्णतामान कमीत कमी 6.6 डिग्री सेल्सीअस असल्याचे आढळून येते.

2002 मध्ये जिल्हयाचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान 870.2 मि.मी. असून सर्वात जास्त रामटेक, कामठी, तालुक्यात पडला. याच वर्षात हिंगणा, काटोल, कळमेश्वर, व सावनेर तालुक्यात पावसाचे प्रमाण इतर तालुक्यापेक्षा सर्वात कमी होते. साधारणतः जून ते ऑक्टोबर या महिन्यात 59 ते 82 दिवस पाऊस पडतो. त्यातही पावसाचे प्रमाण जुन,जूलै व ऑगस्ट या महिन्यातच अधिक असते.

1.7 जमीन व तिचे प्रकार :-

नागपूर जिल्हयात प्रामुख्याने काळी,मोराड,खरडी व बरडी प्रकारची जमीन आढळून येते मध्यम-काळी जमीन प्रामुख्याने सावनेर व कळमेश्वर तालुक्यातील वर्धा नदीच्या खो-यात आणि नागपूर व कामठीचे जवळपास आढळून येते अशून कापसाचे उत्पादनाकरिता उपयुक्त समजली जाते. या जिल्हयात

भोरांड प्रकारची जमीन सर्वच तालुक्यामध्ये आढळून येत असून ज्वारीच्या पिकाकरिता उपयुक्त समजली जाते. खरडी,बरडी जमीन रामटेक तालुक्याचे उत्तरेस व काटोल तालुक्याचे डोंगराळ प्रदेशात आढळून येते.

2. लोकसंख्या

2.1 जनगणना :-

2001 चे जनगणनेप्रमाणे नागपूर जिल्हयाची लोकसंख्या 4051444 असून त्यापैकी 2095489 पुरुष व 1955955 स्त्रिया आहेत. सन 1991 ते 2001 या दशवर्षामध्ये नागपूर जिल्हयाची लोकसंख्या 23.24 टक्के ने वाढल्याचे आढळते. जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येपैकी नागपूर शहर तालुक्याची लोकसंख्या 50.63 टक्के, सावनेर तालुका 5.49 टक्के, पारशिवनी तालुका 3.50 टक्के, रामटेक तालुका 3.74 टक्के, मौदा तालुका 3.37 टक्के, कामठी तालुका 5.18 टक्के, कुही तालुका 3.12 टक्के, भिवापूर तालुका 2.05 टक्के, उमरेड तालुका 3.62 टक्के, नागपूर (ग्रामीण) तालुका 4.74 टक्के, हिंगणा तालुका 4.72 टक्के, काटोल तालुका 3.84 टक्के, नरखेड तालुका 3.18 टक्के, कळमेश्वर तालुका 2.82 टक्के एवढी आहे.

2.2 लोकसंख्येची घनता (1991) :-

1991 च्या जनगणनेप्रमाणे क्षेत्रफळ व लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केल्यास नागपूर जिल्हयाचे क्षेत्रफळ महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या 3.23 टक्के आहे. व लोकसंख्या 4.19 टक्के आहे. नागपूर जिल्हयाकरिता लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. मागे 331 असून हे महाराष्ट्र राज्याकरिता दर चौ.कि.मी. मागे 257 आहे तर भारताचे दर चौ.कि.मी. मागे 267 आहे.

2.3 नागरी व ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण :-

2001 च्या जनगणनेप्रमाणे जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येपैकी नागरी भागामध्ये 64.36 टक्के व ग्रामीण भागामध्ये 35.64 टक्के लोक वास्तव्य करीत आहेत. जिल्हयाची नागरी लोकसंख्या 2607362 असून त्यापैकी एकटया नागपूर शहरात 2051320 एवढे लोक वास्तव्य करीत आहेत. म्हणजेच जिल्हयातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी 79 टक्के लोकसंख्या नागपूर शहरामध्ये व उर्वरित 21 टक्के लोकसंख्या कामठी, कामठी कटकमंडळ, काटोल, नरखेड, मोवाड,सावनेर,खापा,कळमेश्वर, मोहपा, रामटेक,उमरेड, डिगडोह, वाडी, चिचोली, वलणी, मनसर, हिंगणा, सिल्लेवाडा, कन्हान(पिंपरी) टेकाडी, कांद्री, महादुला, कोराडी, तोतलाडोह, वानाडोंगरी, निलडोह,येरखेडा अशा सत्तावीस नागरी विभागात विभागल्या गेली आहे.

2.4 लोकसंख्येतील स्त्री - पुरुष प्रमाण :-

जिल्हयात दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण 2001 च्या जनगणनेप्रमाणे 934 असून महाराष्ट्राच्या 922 च्या तुलनेत हे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण भागात हे प्रमाण 936 असून नागरी भागात हे प्रमाण 932 आहे.

2.5 अनुसुचित जाती व जमाती (1991) :-

जिल्हयातील एकूण लोकसंख्येत अनुसुचित जातीचे नवबौध्दासह प्रमाण 18.53 टक्के असून अनुसुचित जमातीचे प्रमाण 13.93 टक्के आहे. हेच प्रमाण राज्याकरिता अनुक्रमे 11.09 व 9.27 टक्के आहे.

2.6 कामगार :-

1991 च्या जनगणनेप्रमाणे नागपूर जिल्हयामध्ये एकूण मुख्यतः काम करणारे 1167900 असून 64900 सिमांतीक कामगार आहेत. उरलेले 2054400 हे काम न करणारे आहेत. मुख्य कामगारापैकी 214700 शेतकरी,280200 शेतमजुर,25300 वस्तू निर्माण प्रक्रिया सेवा व दुरुस्त्या इ. घरगुती उद्योगात काम करणारे असून 647700 कामगार इतर व्यवसायात गुंतलेले आहेत.

2.7 लोकसंख्येची वयोगटानुसार रचना :-

1991 च्या जनगणनेनुसार नागपूर जिल्हयामध्ये 0 ते 14 या वयोगटात 1112837, 15 ते 19 या वयोगटात 336856, 20 ते 24 या वयोगटात 333674, 25 ते 29 या वयोगटात 281218, 30 ते 34 या वयोगटात 236696, 35 ते 39 या वयोगटात 211715, 40 ते 49 या वयोगटात 314992, 50 ते 59 या वयोगटात 214938 व 60 वर्षापेक्षा अधिक या वयोगटात 234283 लोकसंख्या आहे. वय अनिर्देशित लोकसंख्या 10860 इतकी आहे.

2.8 साक्षरता (ग्रामीण व नागरी) :-

2001 च्या जनगणनेप्रमाणे एकूण लोकसंख्येपैकी 84.18 टक्के लोकसंख्या साक्षर असून ग्रामीण भागात 75.76 टक्के व नागरी भागात 88.75 टक्के आहे. साक्षरतेचे स्त्री व पुरुष यांचेसाठी प्रमाण अनुक्रमे 77.65 व 90.25 टक्के आहे.

2.9 वापरातील निवासी घरांची व कुटुंबांची संख्या :-

1991 च्या जनगणनेनुसार जिल्हयातील एकूण कुटुंबाची संख्या 610795 एवढी असून त्यापैकी 244165 ग्रामीण भागात व 366630 नागरी भागात आहेत. एकूण कुटुंबाच्या संख्येत बेघर कुटुंबाचा समावेश असून त्यात संस्था कुटुंबाचा समावेश नाही. एकूण निवासी घरांची संख्या 773170 एवढी असून ग्रामीण भागात 313700 व नागरी भागात 459470 घरे आहेत.

2.10 जिल्हा उत्पन्न अंदाज व दरडोई उत्पन्न :-

जिल्हास्तरावरिल उत्पन्नाचे अचूक अंदाज करण्यासाठी प्रदेशाला संचयित होणारे उत्पन्न हि संकल्पना वापरणे योग्य असले तरी, जिल्हा स्तरावरिल आर्थिक उलाढालीचा परिणाम जिल्हयापुरताच मर्यादित रहात नसल्यामुळे संबंधित जिल्हयाला बाहेरून प्राप्त होणारे व संबंधित जिल्हातून बाहेर जाणा-या उत्पन्नाचे मोजमाप करणे शक्य नसल्याने सदर पध्दतीचा वापर करता येत नाही. त्यामुळे उत्पन्न स्त्रोत पध्दती (Income originating approach) या संकल्पनेचा अवलंब करून जिल्हा स्तरावरिल उत्पन्नाचे अंदाज तयार करण्यात आलेले आहेत.

जिल्हा उत्पनाचे अंदाज तयार करण्याकरिता लागणारी मुलभुत माहिती अजुनही समाधाणकारकरित्या उपलब्ध नाही. प्राथमिक क्षेत्राकरिता बहुतांश आकडेवारी उपलब्ध आहे. माञ इतर

आकडे उपलब्ध नाही त्या क्षेत्राकरिता जिल्हावार अनुरूप असे निर्देशांक वापरून त्या प्रमाणे राज्यस्तरावरिल उत्पन्नाची जिल्ह्यामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे.

आकडेवारिचा उपलब्धतेचा अभाव अनुरूप निर्देकांचा वापर तसेच पध्दती मधील अंतर्भुत उणिवा या सर्वांमुळे जिल्हा उत्पन्नाचे अचूक अंदाज बांधण्यामध्ये मर्यादा येत असल्याने हे अंदाज ढोबळ मानाणे जिल्हयातील उत्पन्नाची पातळी आजमाविण्याकरिता वापरावेत.

जिल्हयाचे नियोजनाकरिता जिल्हा उत्पन्नाची अत्यंत आवश्यकता असल्याने जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन या वार्षिक प्रकाशनात नागपूर जिल्हयाचे जिल्हा उत्पन्न अंदाज सन 2000-2001 व 2001-2002 प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसाधारणपणे अर्थव्यवस्थेच्या 15 क्षेत्राचे चालू व स्थिर किंमतीनुसार जिल्हा उत्पन्नाचे अंदाज तयार करण्यात आले आहेत. त्या करिता आवश्यक ती माहिती जिल्हा व राज्य पातळीवरून संकलित करण्यात आली असून अर्थव्यवस्थेतील ज्या क्षेत्रातील माहिती जिल्हा पातळीवर स्वतंत्रपणे उपलब्ध होवू शकत नाही अशा प्रकारची माहिती राज्य पातळीवर एकत्रितपणे उपलब्ध करून घेण्यात आली आणि संबंधित जिल्हयांचा वाटा अंदाजित करण्यात आलेला आहे.

जिल्हा उत्पन्न अंदाज तयार करतांना आर्थिक उत्पादन क्षेत्राचे 1) प्राथमिक 2) दुय्यम व 3) तृतीय क्षेत्र यानूसार तीन क्षेत्रात विभाजन करून त्यानूसार उत्पन्न विचारात घेण्यात आले.

2.10.1 चालू किंमतीनूसार जिल्हा उत्पन्न :-

नागपूर जिल्हयाचे सर्व क्षेत्रातील चालू किंमतीनूसार सन 2001-2002 चे स्थुल जिल्हा उत्पन्न रू. 127260417 असून स्थुल दरडोई जिल्हा उत्पन्न रू. 27755 आहे.त्याच प्रमाणे निव्वळ जिल्हा उत्पन्न रू. 113677312 असून निव्वळ दरडोई जिल्हा उत्पन्न रू.27759 आहे. चालू किंमतीनूसार जिल्हयाचे स्थुल उत्पन्न राज्य उत्पन्नाचा 4.69 टक्के व निव्वळ राज्य उत्पन्न राज्य उत्पन्नाचा 4.70 टक्के आहे.

चालू किंमतीनूसार जिल्हयाचा स्थुल उत्पन्नाचा 14.57 टक्के प्राथमिक क्षेत्रातून 26.56 टक्के द्वितीय क्षेत्रातून व उर्वरित 58.88 टक्के तृतीय क्षेत्रातून प्राप्त झाले आहे.

2.10.2 स्थिर किंमतीनूसार जिल्हा उत्पन्न :-

नागपूर जिल्हयाचे सर्व क्षेत्रातील स्थिर किंमतीनूसार सन 2001-2002 स्थूल जिल्हा उत्पन्न रू. 77766607 असून स्थुल दरडोई जिल्हा उत्पन्न रू. 18990 आहे. त्याच प्रमाणे निव्वळ जिल्हा उत्पन्न रू. 69127652 असून निव्वळ दरडोई जिल्हा उत्पन्न रू 16880 आहे. स्थिर किंमतीनूसार जिल्हयाचे स्थुल उत्पन्न राज्य उत्पन्नाच्या 4.67 टक्के व निव्वळ राज्य उत्पन्न राज्य उत्पन्नाच्या 4.69 टक्के आहे.

स्थिर किंमतीनूसार जिल्हयाच्या स्थुल उत्पन्नाचा 15.96 टक्के प्राथमिक क्षेत्रातून 25.58 टक्के द्वितीय क्षेत्रातून व उर्वरित 54.46 टक्के तृतीय प्राप्त झाले आहे.

3 वने

3.1 जिल्हयातील एकूण वनक्षेत्र :-

2002-2003 वर्षासाठी जिल्हयातील एकूण अस्थायी. वनक्षेत्र 2765 चौ.कि.मी. असून ते जिल्हयाच्या एकूण क्षेत्राच्या 27.95 टक्के आहे. या जिल्हयातील बहुतांश वनभाग रामटेक तालुक्यातील पेंच नदीच्या दोन्ही कि ना-यावर सातपुडा टेकडयाच्या पायथ्याशी आहे. तसेच काटोल तालुक्याचा पश्चिम भाग,नरखेड,उमरेड,कुही,हिंगणा आणि भिवापूर या तहसिलीमध्ये कमी अधिक प्रमाणात वनक्षेत्र आहे. एकूण वनक्षेत्राची राखीव सुरक्षित व अवर्गीकृत अशा तीन भागांमध्ये विभागणी करण्यांत येते. त्यापैकी 191 चौ.कि.मी. (6.91 टक्के) अवर्गीकृत क्षेत्र हे महसूल विभागाच्या देखरेखीखाली येते. आणि 2574 चौ.कि.मी. (93.09 टक्के) राखीव वनक्षेत्र वनविभागाच्या देखरेखीखाली येते. एकूण वनव्याप्त क्षेत्राच्या मानाने राखीव वनक्षेत्र 56 टक्के , संरक्षित वनक्षेत्र 26 टक्के व अवर्गीकृत वनक्षेत्र 19 टक्के एवढे आहे. वनविभागाचे राखीव वनक्षेत्रात महाराष्ट्र वनविकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यास आलेल्या वनक्षेत्राचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

3.2 वनोत्पादन :-

रामटेक,सावनेर,हिंगणा,नरखेड,भिवापूर व कुही या परिक्षेत्रामध्ये उत्तम दर्जाची सागवानी झाडांची वने आढळून येतात. सागवानी झाडासोबतच या जिल्हयामध्ये सालई,धावडा,खैर,बांबू,पळस व तेंदू या जातीची झाडे आढळून येतात. मुख्य व गौण वनोत्पादानापासून 2002-2003 या वर्षामध्ये 175035ह. रुपये एवढे उत्पन्न झाले, ते गेल्या वर्षाच्या तुलनेत अंदाजे 310.06 टक्क्यांनी घट झाल्याचे दिसून येते.

3.3 वनविकास कार्यक्रम :-

धूप जोराच्या पाण्याचा निचरा व पूर यापासून जमिनीचे संरक्षण आणि जमीनीचा कस टिकवून शेतीस सहाय्य करण्याच्या दृष्टीने वने महत्वाची कामगिरी बजावतात त्यादृष्टीने वनविकासाकरिता जिल्हास्तरावर (अ) मध्यवर्ती रोपवाटिकांची स्थापना (ब) निकृष्ट वनांचे पुर्नवनीकरण (क) औद्योगिक व व्यापारी उपयोगासाठी लागाणा-या वन झाडांच्या जातीच्या लागवडीची योजना (ड) वैरण साधन संपत्तीचा विकास (इ) किरकोळ जंगल उत्पन्नाचा विकास वनसंयुग योजना व कंत्राटदारांचे उच्चाटन इत्यादी महत्वाच्या योजना राबविण्यात येतात. नागपूर जिल्हयामध्ये सन 2002-2003 या वर्षात वनविभागातील बिगर आदिवासी व आदिवासी योजनेअंतर्गत एकूण 22.18 लाख रुपये खर्च करण्यात आले. 2001-2002 वर्षाच्या तुलनेत 2002-2003 वर्षात वन विभागातील योजनेवर 7.6 टक्के नी खर्च करण्यात आल्याचे दिसते.

4. कृषी

4.1 जमीनीचा वापर :-

2002-2003 वर्षात जिल्हयातील एकूण भौगोलिक क्षेत्र 986 हजार हेक्टर होते. त्यापैकी 66.11 टक्के क्षेत्र लागवडीलायक असून 5.59 टक्के क्षेत्र कायम गुरे चरण व इतर चरायची जमीन याखालील होते. तसेच 12.19 टक्के क्षेत्र शेतीकरिता उपयुक्त नसलेले क्षेत्र होते. 1998-99 वर्षामध्ये 652 हजार हेक्टर लागवडीलायक क्षेत्रापैकी 534 हजार हेक्टर क्षेत्र निव्वळ पिकाखालील क्षेत्र असून ते एकूण क्षेत्राच्या 81.90 टक्के एवढे होते व दुबार पिकाखालील क्षेत्र निव्वळ पिकाखालील क्षेत्राच्या 27.37 टक्के होते.

4.2 वहिता धारण जमीनींची संख्या, त्यांचे क्षेत्रफळ आणि वर्गीकरण :-

वहिताखालील जमीन धारणाचे गटाप्रमाणे भूधारकांची व क्षेत्रांची टक्केवारी खालील प्रमाणे होती.

अ.क्र.	धारणगट हेक्टर	भूधार (टक्केवारी)		क्षेत्र (टक्केवारी)	
		1985-86	1990-91	1985-86	1990-91
1	2	3	4	5	6
1	2 पर्यंत	46	53	18	23
2	2 ते 5	37	34	36	40
3	5 ते 10	14	11	31	26
4	10 ते 20	3	2	13	9
5	20 व त्यापेक्षा जास्त	-	-	2	2

1990-91 चे कृषी गणनेचे अस्थायी आकडेवारीनुसार एकूण भूधारकापैकी 96.18 टक्के वैयक्तीक भूधारक, 3.62 टक्के संयुक्त धारक, व 0.20 टक्के संस्थाचे धारक होते. 1985-86 च्या तुलनेत 1990-91 वर्षी 2 हेक्टर पर्यंतच्या भूधारकांच्या संख्येत 15 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. मात्र इतर गटात घट आढळते. तसेच क्षेत्रफळाचे बाबतीत 2 हेक्टर पर्यंतच्या गटात 28 टक्के आणि 2 ते 5 पर्यंतच्या गटात 11 टक्के वाढ झालेली आहे. परंतु इतर गटात घटचा झालेली आहे.

4.3 पीक पध्दती :-

1998-99 वर्षात जिल्हयातील एकूण पिकाखालील 680400 हेक्टर क्षेत्रापैकी अन्नधान्ये पिकाखालील 276600 हेक्टर क्षेत्र म्हणजेच 40.65 टक्के एवढे होते. अन्नधान्ये पिकापैकी सर्वात जास्त क्षेत्र ज्वारी पिकाखाली म्हणजे 27.77 टक्के होते. डाळी वर्गीय पिकाखालील 38.18 गव्हाखालील 22.38 टक्के ,धानाखालील 11.50 टक्के इतके होते. तसेच एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी कापूस याखाली 11.11 टक्के, फळे व भाजीपाला या पिकाखाली 6.76 टक्के व गळीताचे पिकाखालील क्षेत्र 39.17 टक्के होते.

4.4 पिकांचे उत्पादन :-

2002-2003 या वर्षात तृणधान्याचे उत्पादन 121900 मे.टन झाले असून मागील वर्षाचे तुलनेत 7.37 टक्क्याने घट झाल्याचे आढळून येते. कडधान्याचे उत्पादनात मागील वर्षाचे तुलनेत 40.73 टक्के घट झाली आहे. तसेच तेलबियाचे उत्पादनात चालु वर्षी 37.35 टक्क्याने घट झाल्याचे आढळून येते. तेलबियामध्ये नागपूर जिल्हयात सर्वात जास्त उत्पादन भुईमुंग पिकाचे असल्याचे निदर्शनास येते.

4.5 मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पादन :-

जिल्हयामध्ये ज्वारी,गहू,धान,कापूस,हरभरा,तूर,शेंगदाण,जवस,तीळ,मिरची व संत्री ही महत्वाची पिके होत. सन 2002-2003 मध्ये ज्वारीचे दर हेक्टरी उत्पादन 884 कि.ग्रॅम गहू, 1048 कि.ग्रॅम तांदुळ, 968 कि.ग्रॅम,तूर 533 कि.ग्रॅम,हरभरा 559 कि.ग्रॅम,भूईमूग 689 कि.ग्रॅम,जवस 0 कि.ग्रॅम,मिरची 173 कि.ग्रॅम,व हळद 533 कि.ग्रॅम होते. तसेच कापसाचे दर हेक्टरी उत्पादन 165 गासडी एवढे होते. 2001-2002 वर्षाचे तुलनेत कापसाचे दर हेक्टरी उत्पादनात 2002-2003 वर्षामध्ये 1.23 टक्क्याने वाढ झालेली आढळते.

4.6 अधिक उत्पन्न देणा-या पिकांचे क्षेत्र :-

तृणधान्याखालील संकरीत व जादा उत्पन्न देणा-या पिकांमध्ये प्रामुख्याने गहू,ज्वारी ,भात (धान) या पिकांचा समावेश होतो. ज्वारीच्या एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी संकरीत व जादा उत्पन्न देणा-या ज्वारीचे क्षेत्र 73.28 टक्के, गव्हाचे एकूण क्षेत्रापैकी व जादा उत्पन्न देणा-या गव्हाचे क्षेत्र 80.12 व एकूण धान या पिकाखालील क्षेत्रापैकी व जादा उत्पन्न देणा-या धानाचे क्षेत्र 85.38 टक्के एवढे होते. एकंदरीत 2001-2002 च्या तुलनेत अधिक उत्पादन देणा-या तसेच संकरीत पिकाच्या क्षेत्रात ब-याच तालुक्यात वाढ झालेली आढळते.

4.7 रासायनिक खताचे वाटप :-

जिल्हयात सन 2002-2003 मध्ये 146909 मे. टन रासायनिक खताचे वाटप करण्यात आले. 2001-2002 च्या तुलनेत 2002-2003 मध्ये रासायनिक खतांचे वाटपात जवळजवळ 30.91 टक्क्याने घट झालेली दिसून येते.

4.8 पीक संवर्धन :-

पीक संवर्धन मोहिमेअंतर्गत जिल्हयातील शेतक-यांना विशेष अन्नधान्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत भात बियाणाचे वाटप केल्या जाते. या योजनेअंतर्गत बिगर आदिवासी योजनेअंतर्गत 1.30 लाख रुपये, खर्च करण्यात आले. कडधान्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाद्वारे बिगर आदिवासी योजनेअंतर्गत 1.07 लाख रुपये खर्च करण्यात आले. फलोत्पादन विकासाकरिता बिगर आदिवासी व आदिवासी योजना तसेच विशेष घटक योजना मिळून एकंदर 18.70 लाख रुपये खर्च करण्यांत आले. त्यात गावठी रोपे बोरे,आंबा व काजू झाडांचे वाटप सुधारित जातीत रुपांतर करण्यासाठी कलमा व वाटप करण्यात आली. तसेच अल्प भूधारक सिमांतीक शेतक-यांना फलोत्पादनाच्या विकासासाठी भांडवल अनुदान योजनाही राबविण्यात आली.

4.9 शेतमाल साठवणूकीच्या व नियंत्रित बाजारपेठेच्या सोयी :-

जिल्हयामध्ये एकूण 10 कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यरत असून त्या सर्व ठिकाणी शेतक-यांनी आणलेल्या विक्री योग्य मालाच्या साठवणूकीची सोय आहे. तसेच इतरही सोय उपलब्ध आहे. सन 2002-2003 मध्ये जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत तांदूळ 14859 मे.टन, गहू 158139 मे.टन,ज्वारी 2748 मे.टन,कापूस 21632 मे.टन. तूर 17651 मे.टन,. मूग 172 मे.टन,उडीद 22 मे.टन,हरभरा 12538 मे.टन, भूईमूग 1558 मे.टन, जवस 377 मे.टन, तीळ 11 मे.टन, सोयाबीन 129424 मे.टन, सुकलेली मिरची 17094 मे.टन, व संत्री 104524 मे.टन, कृषी उत्पन्नाची विक्री करण्यात आली. या सर्वाचे एकूण मुल्य 4362931 हजार रुपये होते.

4.10 जमीन सुधारणा :-

विभागीय मृदसंधारण अधिकारी,नागपूर यांचेमार्फत जमीन विकासाची कामे केल्या जातात. जमिनीला बांध घालणे, व उतारावर समतल घालणे इत्यादी उपायाद्वारे जमिनीचा विकास करण्यात येतो. कामावरील खर्च हा रोजगार हमी योजनेतून केल्या जातो. सन 2002-2003 मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत 517.42 लाख रुपये खर्च करण्यात आले. तसेच विशेष घटक योजनेअंतर्गत जिल्हा कृषी अधिकारी मार्फत निवडक अनुसुचित जातीच्या व नवबौध्द शेतक-यांना जमीन सुधारणेकरिता अर्थसहाय्य देण्यांत येते. ओलिताच्या सोयीची उपलब्धता वाढविण्याकरिता शेतक-यांना विहीरी बांधण्यासाठी जिल्हयांतील भूविकास अधिकोषामार्फत कर्जाचे वाटप करण्यात येते.

4.11 इतर विकास कार्यक्रम:-

कृषी विकासाच्या दृष्टीने जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निरनिराळे कार्यक्रम राबविले जातात. उदा (1) तालुका बीजगुणन क्षेत्राचा विकास (2) एकात्मिक भात विकास कार्यक्रम (3) कडधान्य व तेलबिया उत्पादन कार्यक्रम फलोत्पादन कार्यक्रमांतर्गत खालील विकासाच्या योजना राबविण्यात येतात. (1) बागायती रोपमळयांचे बळकटीकरण (2) गावठी बोर व आंब्याच्या झाडांचे पुनरुज्जीवन व ग्रामपंचायतींना आंब्याच्या झाडाच्या नुतनीकरणासाठी प्रोत्साहन सहाय्य योजना.

पीक संवर्धन व फलोत्पादन या योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी योजनेअंतर्गत नागपूर जिल्हयामध्ये सन 2002-2003 वर्षाकरिता अनुक्रमे 48.72 व 17.25 लाख रुपये खर्च करण्यांत आले. तसेच मृद व जलसंधारण या योजनेअंतर्गत 12.39 लाख रुपये खर्च करण्यांत आला.

5. जलसिंचन

5.1 जलसिंचनाची कामे :-

जिल्हयाचा कृषी विषयक उत्कर्ष साधण्यासाठी व सर्वसाधारण आर्थिक सुस्थितीसाठी सिंचन क्षमता वाढविणे ही एक महत्वाची बाब होय. जिल्हयामध्ये विहीरी लहान पाटबंधारे,मध्यम प्रकल्प, मोठे प्रकल्प व उपसा सिंचन योजना याद्वारे तसेच नदी नाल्यावर पंप बसवून सिंचन केल्या जाते. जिल्हयामध्ये सन 1998-99 मध्ये एकूण निव्वळ पिकाखालील क्षेत्रापैकी फक्त 23.15 टक्के हेक्टर क्षेत्र निव्वळ ओलिताखाली होते. सन 1998-99 मध्ये जिल्हयात एकूण सिंचन विहीरींची संख्या 53646 एवढी होती. पैकी 37973 विहीरी फक्त बागायतीसाठी उपयोगात आणल्या गेल्या.

5.2 निरनिराळया पिकाखालील ओलिताचे क्षेत्रः-

सन 1998-99 मध्ये एकूण ओलिताचे क्षेत्रापैकी तृण धान्ये 47.36 टक्के,कडधान्ये 7.27 टक्के,उस 0.54 टक्के,मिरची व मसाल्याचे पदार्थ 9.01 टक्के, फळे व भाजीपाला 30.91 टक्के, कापूस 0.20 टक्के, गळीताची पिके 4.51 टक्के, ओलित करण्यांत आले.

5.3 सिंचन क्षेत्र :-

जिल्हयामध्ये सन 1998-99 मध्ये निव्वळ भिजणारे क्षेत्र 123640 हेक्टर एवढे होते. पैकी विहीरीद्वारे 71015 हेक्टर आणि तळी व कालवे याद्वारे 52625 हेक्टर क्षेत्राचे सिंचन करण्यात आले.

5.4 सिंचन प्रकल्पः-

नागपूर जिल्हयातील पूर्ण झालेल्या सिंचन प्रकल्पाचे एकूण लाभक्षेत्र 256755 हेक्टर असून 2002-2003 या वर्षामध्ये ओलिताखाली असलेले एकूण क्षेत्र 80515 हेक्टर म्हणजेच 31.36 टक्के इतके होते.

6. पशुसंवर्धन व पशुवैद्यकीय सेवा

6.1 पशुधनः-

नागपूर जिल्हयामध्ये 1997 च्या पशुगणनेप्रमाणे एकूण पशुधनाची संख्या 1098323 एवढी आहे. हीच पशुगणनेची संख्या 1992 मध्ये 1060836 एवढी होती. 1997 च्या पशुगणनेप्रमाणे एकूण पशुधनापैकी गायी व बैल 52.40 टक्के,म्हशी,रेडे 8.96 टक्के,मेंढया, बकरे 30.06 टक्के, व इतर पशुधन 1.36 टक्के आढळून येते. 1992 ते 1997 वर्षाचे काळात पशुधनांची संख्या 3.53 टक्क्यांनी वाढ झाल्यांचे आढळून येते. तर कुक्कुटांची संख्या 0.45 टक्क्यांनी घट झाल्याचे आढळून येते. शेतीला जोडधंदा म्हणून विस्तृत प्रमाणात ग्रामीण भागात कुक्कुट पालनाचा व्यवसाय करण्यात येतो. 1997 च्या पशुगणनेप्रमाणे दर चौ.कि.मी. मागे पशुधनाची घनता 111 आढळून येते.

6.2 पशु उत्पादन व दुग्ध उत्पादन :-

नागपूर जिल्हयामध्ये शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय केला जातो. 2002-2003 या वर्षात नागपूर जिल्हयात 8951000 लिटर दुधाचे उत्पादन झाले असल्याचे आढळून येते. म्हणजेच प्रति दिन सरासरी 25000 लिटर दुध गोळा करण्यात येते.

6.3 पशुवैद्यकीय सेवा :-

नागपूर जिल्हयामध्ये 1 पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, 45 दवाखाने व 46 पशुवैद्यकीय प्रथमोपचार केंद्रे आहेत. हयाशिवाय 1 फिरते पशुरोग नियंत्रण पथक 1 दक्षता पथक, व 2 फिरते पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. कृत्रिम गर्भधारणेकरीता जिल्हयामध्ये 176 कृत्रिम रेतन केंद्रे आहेत. चिकित्सालय दवाखाने व मदत केंद्रामध्ये उपचार केलेल्या पशुंची संख्या सन 2002-2003 मध्ये 521257 एवढी आहे. तसेच 176 कृत्रिम गर्भधारणे केंद्रामध्ये 68307 पशुवर कृत्रिम गर्भधारणा करण्यात आली. आणि 1693732 जनावरांना विविध पशुवैद्यकीय संस्थाद्वारे लसी टोचण्यांत आल्या.

6.4 पशुधन विकासाचे कार्यक्रम :-

पशुधन विकासाकरिता जिल्हा योजनेअंतर्गत खालील महत्वाचे कार्यक्रम राबविले जातात. 1) पशुवैद्यकीय दवाखाना व पशु प्रथमोपचार केंद्र बांधणे 2) तोंडाचे व पायाचे रोगावर नियंत्रण ठेवण्याकरीता अर्थसहाय्य 3) मध्यवर्ती अंडी उबविण्याकरिता यंत्रे खरेदी व निवासी व बिगर निवासी इमारतीचे बांधकाम 4) आधारभत ग्रामकेंद्राची / विभागीय कृत्रिम रेतन केंद्राची स्थापना 5) संकरीता कालवडी जोपासण्याकरिता सहाय्य 6) अनुसुचित जाती व दुर्बल घटकासाठी बदकांच्या पिलांचे गट वाटप इ. तसेच दुध व्यवसाय विकासाकरिता अ) दुग्ध उत्पादक / दुग्ध व्यवसाय विकास संस्था/ संघ महासंघ यांना कार्यरत स्थापण्यासाठी आर्थिक सहाय्य ब) भाकड-गाभण म्हशींची पुरवठा (वाहतूक व खाद्य अनुदानासह) क) देशी गायीचे वाटप ड) मुंबईच्या तबेल्यातील 1 वर्ष वयाच्या उच्च पैदास क्षमतेच्या पारडयांना पुरवठा इ. योजना राबविण्यात येतात.

2002-2003 या वर्षात पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभागाद्वारे जिल्हा योजनेअंतर्गत (आदिवासी व बिगर आदिवासींसाठी) अनुक्रमे 2.78 व 4.40 लाख रुपये खर्च करण्यांत आले.

7 मत्स्यव्यवसाय

7.1 मत्स्योत्पादन :-

नागपूर जिल्हयामध्ये एकूण 15037 हेक्टर क्षेत्र मत्सोत्पादनासाठी अनुकूल आहे. याशिवाय 650 कि.मी. लांबीचे नदीचे पात्र देखील मत्स्यव्यवसायासाठी अनुकुल आहे. जिल्हयामध्ये साधारणतः मरळ,कतला,मगर,कटवा,पोष्टी,कोलस,झिंगा इत्यादी प्रकारचे मासे आढळून येतात. सन 2002-2003 मध्ये मत्स्यव्यवसायासाठी उपयोगात आणलेल्या 15037 हेक्टर क्षेत्रापासून 7432 मे.टन भूजल मत्स्योत्पादन घेण्यात आले. त्याचे एकूण मूल्य 1858 लाख रुपये एवढे आहे. तसेच मत्स्यबीज उत्पादन केंद्रांना मत्स्यव्यवसायासाठी 220 लाख मत्स्यबीजे पुरविण्यात आली. 1997 च्या पशुगणनेनुसार मासेमारी व्यवसायात गुंतलेलेल्यांची लोकसंख्या 4591 इतकी असल्याचे दिसून येते.

7.2 मत्स्य विकास उत्पादनाचे कार्यक्रम :-

नागपूर जिल्हयामध्ये मत्स्यव्यवसायाचा विकास करण्याकरिता जिल्हा योजनेअंतर्गत खालील प्रमाणे कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

1. मत्स्यबीज उत्पादन केंद्राची स्थापना
2. अवरुध्द पाण्यातील मत्स्य संवर्धन
3. मच्छीमार युवकांना प्रशिक्षण
4. मत्स्यव्यवसाय विकास संस्था स्थापन करणे

तसेच इतरही महत्वाच्या योजना राबविण्यात येतात. सन 2002-2003 मध्ये मत्स्योत्पादन कार्यक्रमांतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी उपयोजनेअंतर्गत एकूण 23.40 लाख रुपये खर्च करण्यात आले.

8 विद्युत

8.1 विद्युतीकरण :-

2001 चे जनगणनेनुसार नागपूर जिल्हयामध्ये 1562 वस्ती असलेली व 312 ओसाड अशी एकूण 1874 गावे आणि 23 शहरे आहेत. मार्च,1987 पर्यंत सर्व गावांचे व शहरांचे महाराष्ट्र राज्य विद्युत मंउळाद्वारे विद्युतीकरण पूर्ण करण्यात आले आहे. म्हणजेच तेंव्हा पासून नागपूर जिल्हयामध्ये 100 टक्के विद्युतीकरण झाले आहे.

8.2 विद्युतीकरण केलेले शेतीचे पंप:-

जिल्हयामध्ये 31 मार्च, 2002 पर्यंत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामार्फत एकूण 62333 शेतीचे पंपाना वीज पुरवठा करण्यात आला.

8.3 वीजेचा वापर:-

2002-2003 मध्ये 2136055 हजार कि.वॅट तास विजेचा वापर करण्यात आला. त्यापैकी घरगुती वापरासाठी 24.32 टक्के,व्यापारी कामासाठी व लघुशइतीसाठी 5.74 टक्के , औद्योगिक वापरासाठी 47.81 टक्के,सार्वजनिक दिवाबत्तीसाठी 2.12 टक्के,कृषीकामाकरिता 6.21 टक्के व इतर कामाकरीता 13.81 टक्के विद्युत वापर करण्यात आला. तसेच जिल्हयामध्ये 649018 विद्युत संवर्धने (कनेक्शन्स) दिल्या गेलेले आहेत. यावरुन असे आढळून येते की, मागील वर्षाच्या तुलनेत 2002-2003 या वर्षात वीजेच्या वापरात 6.64 टक्के वाढ व संबंधनात 1.03 टक्के नी वाढ झालेली आहे.

8.4 विद्युत उत्पादन केंद्रे :-

नागपूर जिल्हयामध्ये खापरखेडा व कोराडी याठिकाणी कोळशाच्या सहाय्याने विद्युत निर्मिती केली जाते. तसेच पेंच प्रकल्पापासून जलविद्युत निर्माण केली जाते.

9. खाणकाम व उद्योग

9.1 खनिज उत्पादने :-

नागपूर जिल्हा खनिजाचे बाबतीत समृध्द आहे. जिल्हयामध्ये आढळणारी महत्वाची खनिजे म्हणजे कोळसा,मॅगनीज,डोलामाईट व चुन्याचे दगड,पांढरी माती व लोखंड ही होत. मॅगनीज या खनिजाचे साठे मुख्यत्वे करुन नागपूर व भंडारा जिल्हयामध्ये असल्यामुळे मॅगनीज उत्पादनाचे बाबतीत नागपूर जिल्हयाला भारतामध्ये महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. कच्चे लोखंड भिवापूर तालुक्यामध्ये भिवापूर नजीक 3 कि.मी. परिसरामध्ये आढळून येते. तेथील दगडामध्ये 55 ते 58 टक्के लोखंडाचे प्रमाण असल्याबाबतचे अनुमान काढण्यात आलेले आहे. चुन्याचे दगड सावनेर, पारशिवनी व रामटेक तालुक्यामध्ये आढळून येतात. अभ्रक आणि टंगस्टन हे देखील नागपूर जिल्हयामध्ये आढळून येतात. अत्यंत महत्वाचे म्हणजे इमारती बांधकामाच्या उपयोगात वापरल्या जाणारी कन्हान नदीतील रेती उत्कृष्ट दर्जाची समजल्या जाते. या रेतीचा साठी नागपूर जिल्हयामध्ये भरपूर प्रमाणात आढळून येतो. इतर

खनिजात पोगमेंट, फेल्सपार,क्वॉर्टज, टंगस्टन,ॲंटीमनी व इमारतीस उपयुक्त दगड नागपूर जिल्हयामध्ये थोडयाफार प्रमाणात आढळून येतो.

9.2 उद्योग व कामगार:-

नागपूर हे शहर महाराष्ट्रातील इतर औद्योगिक शहरापैकी एक होय. जिल्हयामध्ये औद्योगिकरण प्रामुख्याने नागरी भागातच आढळून येते. जिल्हयामध्ये प्रामुख्याने आढळणारे उद्योग म्हणजे कापसापासून सरकी काढणे व गासंडया बांधणे, सुतगिरणी,लाकुड कटाई,कापड गिरण्या,पेपर व स्ट्रॉबोर्ड तयार करणे, रसायने व रासायनिक पदार्थ, फेरोमॅगनीज, प्रकाशनासंबंधी उद्योग,औषधी कारखाने,यंत्रसामुग्री, तांत्रिक अवजारे व सुटे भाग, मुलभत धातू व मिश्र धातू,रबर,प्लास्टिक वगैरे हे होत. जिल्हयात नोंदणीकृत कारखान्यांची संख्या 2002 मध्ये 1733 होती. व 1496 चालू कारखान्यामध्ये 38172 कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला.

9.3 औद्योगिक वसाहत:-

जिल्हयामध्ये उद्योगाचे विकासाकरिता महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत नागपूर पासून 8 कि.मी. अंतरावर हिंगणा येथे औद्योगिक वसाहत स्थापन करण्यात आली आहे. त्याचे एकूण क्षेत्र 746.65 हेक्टर क्षेत्रात औद्योगिक वसाहत स्थापन करण्यात आली आहे.

9.4 बुटीबोरी औद्योगिक वसाहत:-

नागपूर विभागात नागपूर पासून 30 कि.मी. अंतरावर हैद्राबादकडे जाणा-या महामार्गावर बुटीबोरी येथे 2500 हेक्टर जागेवर औद्योगिक वसाहत उभारल्या गेली आहे.

कायमस्वरुपी पाण्याच्या सोयीसाठी वडगांव व नांद धरणातून तसेच कृष्णा नदीतून पाणी देण्यात येत आहे. 11200 चौ.कि.मी. जागा दूरध्वनी केंद्रासाठी मंजूर केली असून या केंद्राची क्षमता 1400 लाईन्स एवढी आहे. ऑप्टीकल फायबर या नवनतम तंत्रज्ञानावर आधारित असल्यामुळे देश-विदेशाच्या संपर्कासाठी त्याचा फायदा होईल. औद्योगिक वसाहतीपासून विमानतळ केवळ 22 कि.मी. अंतरावर आहे. त्याचेही विस्तारीकरण होत आहे. सध्या औद्योगिक वसाहतीत येणा-या उद्योगात निर्यात प्रमुख उद्योगही असल्यामुळे त्यांच्या सोयीसाठी कंन्टेनर कॉर्पोरेशन मार्फत डेपो उभारण्यात आला असून निर्यात फोन सुरु करण्यात आले आहेत. उद्योजकांना वित्तीय सहाय्य पुरविण्यासाठी 2 राष्ट्रीयकृत बँकानी येथे शाखा उघडल्या असून त्यातील एक औद्योगिक बँकेची शाखा आहे.

वरील विवेचनावरुन असे दिसेल की, बुटीबोरी येथील औद्योगिक वसाहतीमुळे नागपूर विभागातील इतर जिल्हयेतील लोकांना रोजगार मिळेल व अनेक पुरक उद्योग येथे सुरु होऊ शकतील.

9.5 सुशिक्षित बेरोजगारांसाठी नवीन बीज भांडवल योजना:-

सुशिक्षित बेरोजगारांना स्वत:चा छोटा उद्योग किंवा व्यवसायामधून स्वयंरोजगारांसाठी प्रवृत्त करण्यासाठी पुर्वीच्या योजनेत कांही ठळक फेरबदल करुन अधिक व्यापक पध्दतीने नवीन बीज भांडवल योजना 1 ऑक्टोबर,1993 पासून लागू करण्यात आली आहे. यासाठी 18 ते 50 वयोगटातील किमान 7 वी पास व्यक्ती किंवा समूह यांना प्रकल्प किंमतीच्या 15 टक्के पर्यंत, जास्तीत जास्त 1.50 लाख रुपये किंवा आर्थिक दुर्बल किंवा अ.जा. जमातीपैकी 1 लाख रुपयापर्यंत प्रकल्प किंमत असल्यास 20 टक्के व 22.5 टक्के पर्यंत मदत मिळू शकते. सदर रक्कम दरसाल 10 टक्के व्याजदराने असून पूढील 7 वर्षात परतफेड करावयाची आहे. ही योजना पूर्णपणे जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येत आहे.

सन 2002-2003 मध्ये बीज भांडवल योजनेअंतर्गत टी.एस.पी. व ओ.टी.एस.पी. योजनेखाली 8.11 लाख रुपयाची तरतूद करण्यात आली असून या योजनेचा 30 लाभार्थ्यांना लाभ मिळालेला आहे.

10.वाहतूक व दळणवळण

10.1 लोहमार्ग :-

नागपूर जिल्हयामध्ये एकेरी , दुहेरी व नॅरोगेज लोहमार्गाची लांबी अनुक्रमे 99.39,186.27 व 135.00 कि.मी. आहे. नागपूर शहर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण असून ते दिल्ली,मद्रास,मुंबई व कलकत्ता इ. प्रमुख शहरांना लोहमार्गाने जोडलेले आहे. नागपूर जिल्हयामध्ये महत्वाच्या रेल्वेमार्गाने विद्युतीकरण पूर्ण करण्यात आले असून सर्व प्रवासी गाडया विद्युत इंजिनाद्वारे धावू लागलेल्या आहेत.

10.2 रस्त्यांची लांबी :-

जिल्हयामध्ये मार्च 2003 पर्येत 7088 कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम ग्रामीण भागात व 2380 कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम नगरपरिषदेच्या हददीत पूर्ण करण्यात आले.

10.3 नोंदणी करण्यात आलेली वाहने :-

जिल्हयामध्ये निरनिराळया प्रकारच्या नोंदणी झालेल्या मोटार वाहनांची संख्या मार्च,2003 अखेर 659027 एवढी आहे. त्यात 86 टक्के मोटर सायकली व स्कुटर, 8 टक्के मोटारी व जीप, 2 टक्के मालमोटारी व 4 टक्के इतर वाहने आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत नोंदणी केलेल्या वाहनात चालू वर्षी 10.16 टक्क्यांनी वाढ झालेली आढळते.

10.4 टपाल व तार कार्यालये :-

